मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.प./न.प./ज.प./ माहितीचा अधिकार
आवक क्र. ६७/२०१८-१९
दिनांक:- १५/१०/२०१८

## Annexure A

### Application under section 6 (1) of The Right to Information Act, 2005.

(See Rule 3)

To,
The Public Information Officer,
नगरसचिव
मि.भा.म.न.पा.

1. Full Name of Applicant:- अंगद प्रदिप दिलीप
2. Address/Contact:- बी. १०. गणेश भवन. नर्मदा नगर. केबीन रोड भाईंदर पूर्व
3. Subject matter of Information:- डीपीआर देणेबाबत
4. Time Period to which the info relates:- From 1 जाने 2017 till the date of Reply to this RTI application.
5. Description of the Information Required:-

१) मा. महासभा दिनांक 19-3-17 ठराव क्रमांक 12 अन्वये डीपीआर करण्यात आला आहे त्याची सत्यप्रत देण्यात यावी .

२) सदरचा डीपीआर न्यायालयीन प्रक्रियेकरिता आवश्यक असल्याने माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत ४८ तासात उपलब्ध करून द्यावा .

6. Whether information is Required by Post or in Person:- Personally/Post.

**Dear P.I.O.**, Please note:-

Kindly provide Stamped, signed and Certified True Copies or Attested Copies or Authenticated Copies of ormation provided on This R.T.I. application as required under the **[Section 6 (1), 4 (3) and 7(9) of The RTI Act, 2005.]**

If you want to Deny any of The Information then please quote the Exemption clause of Section 8 (1) and a brief ason as to how it applies. This is a requirement of The RTI Act, as per [Sec. 7 (8) (i) **read along with Section 19 (5)]**

If any of The Information sought is available with Any Other Department then Kindly transfer the Copy of the ncerned query to that Dept. **(within a period of 5 day's)** and Promptly inform me in Writing of the Same, giving details the Dept. to which it is transferred. **[See Sec. 6 (3) (ii)]**

Date:- १२/१०/१८
Place:- भाईंदर

Signature of the Applicant,
अंगद

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ६७ /2018 दिनांक :- २४/१० /2018

प्रति,
**जनमाहिती अधिकारी,**
**आरोग्य विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**डी.पी.आर देणेबाबत.**

**संदर्भ :-** **1. श्री. प्रदिप दिलीप जंगम यांचेकडील दि. 12/10/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, अर्जदार श्री. प्रदिप जंगम यांनी मा. महासभा दि. 19/5/2017, ठराव क्र. 12 अन्वये तयार करण्यात आलेल्या डी.पी.आर. च्या सत्यप्रतीची मागणी केलेली आहे. सदरचा विषय हा आपल्या विभागाशी निगडीत असल्याने सदर अर्जाची छायांकित प्रत आपणांकडे वर्ग करणेत येत आहे. तरी अर्जदार श्री. प्रदिप दिलीप जंगम यांना अपेक्षीत माहिती आपल्या विभागामार्फत् परस्पर देण्यात यावी हि विनंती. संदर्भास्तव सोबत मा. महासभा दि. 19/5/2017, ठराव क्र. 12 ची प्रत देत आहोत.

कळावे.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

**प्रत :-**
**श्री. प्रदिप दिलीप जंगम**
**जी 10, गणेश भवन,**
**नर्मदा नगर, भाईंदर (पूर्व)**

pc 2\\Pranali\d\Mahiti Adhikar\Letter - Pradeep Jangam.docx

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ६७ /2018 दिनांक :- २४/ १० /2018

प्रति,
**श्री. प्रदिप दिलीप जंगम**
**जी 10, गणेश भवन,**
**नर्मदा नगर, भाईंदर (पूर्व)**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**मा. महासभा दि. 19/5/2017 ठराव क्र. 12 अन्वये डी.पी.आर करण्यात आला आहे त्याची सत्यप्रत देणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 12/10/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण, मा. महासभा दि. 19/5/2017, ठराव क्र. 12 अन्वये तयार करण्यात आलेल्या डी.पी.आर. च्या सत्यप्रतीची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, डी.पी.आर. तयार करणेची जबाबदारी संबंधीत विभागाची आहे व तयार केलेल्या डी.पी.आर. ची प्रत संबंधीत विभागामध्ये असणे अभिप्रेत आहे. करिता आपणांकडील संदर्भित पत्राची छायांकित प्रत पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./67/2018/19, दि. 24/10/2018 अन्वये जनमाहिती, आरोग्य साफसफाई विभाग, मि.भा.मनपा यांचकडे वर्ग करुन आपणांस अपेक्षीत माहिती मुदतीत देणेकरिता कळविले आहे. (संदर्भास्तव सोबत पत्राची प्रत देत आहोत) तरी कृपया आपण जनमाहिती, आरोग्य साफसफाई विभाग, मि.भा.मनपा यांजकडून सदर माहिती घ्यावी.

तथापी, आपणांस मा. महासभा दि. 19/05/2017 ठराव क्र. 12 या ठरावाची सत्यप्रत या पत्रासोबत जोडून देत आहोत. (एकुण पाने 01)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

२४/१०/१८

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\Pranali\d\Mahiti Adhikar\Letter - Pradeep Jangam.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१९/०५/२०१७

प्रकरण क्र. १२ :- खाजगीकरणामार्फत प्रभाग समिती निहाय दैनंदिन वार्ड सफाई, घनकचरा व्यवस्थापन व एकात्मिक डास नियंत्रण करणे कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. :- ९२

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानामधील निकषानुसार शहरातील घनकचरा व्यवस्थापन करणेकरिता रस्ते, गटारे सफाई करणे दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा विलगीकरण करुन (ओला कचरा आणि सुका कचरा) स्वतंत्र वाहनातुन गोळा करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. स्वच्छ भारत अभियांनामध्ये नमुद केल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात आगामी ०५ वर्षामध्ये होणारी लोकसंख्येची वाढ, नव्याने निर्माण होणाऱ्या इमारती, रस्ते, गटारे, व्यवसायीक आस्थापना आदी बाबी विचारात घेऊन दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन करणेकमी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे आवश्यक आहे. सदर कामी तांत्रीक सल्लागाराची नियुक्ती करण्यांत यावी. सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) १० दिवसांत तयार करण्यांत यावा व त्यासाठी ८ दिवसात विशेष मा. महासभा लावून मा. महासभेची मंजूरी घेऊन त्यानंतर १५ दिवसांत निविदा प्रक्रीया करावी.

वरीलप्रमाणे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार झाल्यानंतर अंतिम मंजूरी प्राप्त होईपर्यंत सद्या कार्यरत असलेले निविदाकार यांच्या समवेत उपरोक्त कामाच्या करण्यात आलेल्या करारनामातील अटीशर्तीनुसार मुदतवाढ देणेस व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अन्वये दि. ०१ मे, २०१७ पासून महानगरपालिका क्षेत्रातील ओला व सुका कचरा विलगीकरण मोहिम राबविण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने बंदिस्त वाहनातून ओला व सुका कचऱ्याची वेगवेगळी वाहतुक करण्यासाठी ३ टन क्षमतेची २४ अतिरिक्त वाहने प्रचलीत मंजुर दरात उपलब्ध करणेस व येणाऱ्या खर्चास हि सभा मंजुरी देत आहे

असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता

अनुमोदन :- सौ. डिंपल मेहता

महापौर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
२८/७/२०१७
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका